बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर
धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १७९ वा । बुधवार दिनांक २४ सप्टेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकरभोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- वाशी पोलीस ठाणे अंतर्गत मतीन रा. नेकनुर ता.जि. बिड यांनी दि.२१.०९.२०२५ रोजी वाशी येथे पार-गाव टोलनाका येथे आयशर टेम्पो एमएच २५ यु ०६६९ मध्ये गोवंशीय जातीचे १२ जर्सी गायी वाहनासह एकुण ६,८०,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे जर्सी गायी त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना वाशी पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) ११(१)(अ),११ (१)(एच), ११(१)(एफ),११ (१)(आय) सह प्राणी संरक्षण अधिनियम ५(अ), ५(ब), ९(ब), ११ सह प्राणी परिवहन अधिनियम कलम ४७, ५४, ५६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ऑईल, कॉपर वायरचे नुकसान पोलिसात गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत : दि.२८.०७.२०२५ रोजी गंधोरा शिवारातील लोकेशन क्र आरएसएल २६ या ठिकाणाचे पवनचक्कीचे ठिकाणी अज्ञात व्यक्तीने ट्रान्सफॉर्मर मधील ऑईल कॉपर वायरचे नुकसान करुन ट्रान्सफार्मर पुर्णपणे निकामीर करुन नुकसान केले तसेच तीन फुट लांबीची एकुण तीन कॉपरच्या पट्याचे बस बार अंदाजे १५,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- फिर्यादी नामे- उमाकांत सुर्यकांत घोडके, वय ३६ वर्षे, रा. माले-गाव ता. बार्शी जि. सोलापूर यांनी दि.२२.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२), ३२४(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पानबुडी मोटर, मुगाचे आठ कट्टे, एक शेळीची चोरी

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दत्तात्रय विनायकराव पाटील, रा. व्हंताळ ता. उमरगा जि. धाराशिव यांचे कडोदरा शिवारातील शेतातील पत्राचे शेडचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.१९.०९.२०२५ रोजी. तोडून आत प्रवेश करुन एक लाडा लक्ष्मी पानबुडी मोटर १२ एच पी, मुगाचे आठ कट्टे, एक शेळी, कोरोजन कंपनीचे वेगवेगळी औषधे असा एकुण ५५,००० किंमतीचा माल चोरुन नेला. दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## तुळजापूर बसस्थानकांना नवे नाव - श्री तुळजाभवानी व छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मरणार्थ नामकरण

# शारदिय नवरात्रोत्सवाच्या मुहूर्तावर भाविकांसाठी नवीन एसटीची विशेष सोय पालकमंत्री श्री सरनाईक






धाराशिव.दि.२२ सप्टेंबर (जिमाका) शारदिय नवरात्र उत्सवाचा मंगलारंभ आज देशभर होत असताना, तुळजापूर नगरीत देवीच्या दर्शनासाठी भाविकांचा जनसागर लोटणार आहे.घटस्थापनेपासून कोजागिरी पौर्णिमेपर्यंत लाखो भक्तगण तुळजाभवानीच्या दर्शनासाठी हजेरी लावतात.या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने केलेली भाविकांसाठीची सोय ही यंदाच्या नवरात्रात खास आकर्षण ठरत आहे.

नवरात्र उत्सवाच्या काळामध्ये नव्या ५० बसेस भाविकांच्या सेवेसाठी धावणार असून तुळजापुरातील नागरिकांच्या मागणीला प्रतिसाद देत दोन्ही बसस्थानकाचे नामकरण अनुक्रमे श्री. तुळजाभवानी बसस्थानक व छत्रपती संभाजी महाराज बसस्थानक असे करण्यात आले आहे.त्याचे उद्घाटन परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते दूरदृश्य प्रणाली द्वारे झाले.यावेळी पोलीस अधीक्षक रितु खोखर,एसटी महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक अनघा बारटक्के व विभाग नियंत्रक विनोद भालेराव हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना परिवहन मंत्री तथा पालकमंत्री श्री.सरनाईक म्हणाले की, आई तुळजाभवानीच्या सेवेसाठी अहोरात्र राबणाऱ्या एसटीचे चालक, वाहक व कर्मचारी यांच्या श्रमाला उत्साहाची नवी उर्जा मिळावी म्हणून यंदा ५० नव्या बसेसची भर घालण्यात आली आहे.या बसेस खास भक्तांच्या प्रवासासाठी तुळजापूर मार्गावर धावणार असून,भाविकांना सुखरूप व सोयीस्कर प्रवासाची हमी देणार आहेत.

इतकेच नव्हे तर,दरवर्षीप्रमाणे यंदाही कोजागिरी पौर्णिमेला भरणाऱ्या यात्रेसाठी राज्यभरातून तब्बल ११०० बससेवा सुरू करण्यात येत आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भक्तांसाठी ही सोय म्हणजे सुरक्षित व किफायतशीर प्रवासाची मोठी दिलासादायक बाब ठरणार आहे.

तुळजापूरकरांची अनेक दिवसांची मागणीही यंदा पूर्ण होत आहे.आज घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर तुळजापूरातील दोन बसस्थानकांचे नामकरण करण्यात आले.मुख्य बसस्थानकाला श्री तुळजाभवानी बसस्थानक तुळजापूर हे नाव देण्यात आले असून, दुसऱ्या महत्त्वाच्या बसस्थानकाला छत्रपती संभाजी महाराज बसस्थानक तुळजापूर असे गौरवपूर्ण नाव देण्यात आल्याची माहिती पालकमंत्री सरनाईक यांनी दिली.

पालकमंत्री प्रताप सरनाईक या प्रसंगी बोलताना म्हणाले की,या नामकरणामुळे भक्तिभाव, ऐतिहासिक स्मरण व सांस्कृतिक अभिमान यांचा संगम साधला गेला आहे.आई तुळजाभवानीच्या चरणी नव्या नावाचा हा मंगल प्रसाद अर्पण झाल्याने स्थानिक नागरिक व भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

एसटी महामंडळाकडून भाविकांच्या सेवेसाठी उचललेले हे पाऊल हे फक्त सोयीपुरते नाही,तर ती आई तुळजाभवानीच्या भक्तांसाठीची नवी वाहतूक-यज्ञसेवा ठरणार आहे.

आई तुळजाभवानीचा आशीर्वाद एसटीच्या प्रत्येक कर्मचाऱ्यांवर व भाविक प्रवाशांवर सदैव राहो,अशी कृतज्ञ भावना व्यक्त परिवहन मंत्री तथा पालकमंत्री श्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली.

# आपण स्वत: आणि जिल्हा प्रशासन मदतीसाठी तत्पर आहोत-आमदार राणाजगजतिसिंह पाटील



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- राज्यात व जिल्ह्याज यापूर्वी अशी विदारक परिस्थिती कधीच उद्भवली नव्हती. शेती -मातीवर निसर्ग अक्षरशः कोपला आहे. अतिवृष्टीमुळं भूम, परंडा तालुक्यातील अनेक गावं पाण्याखाली गेली आहेत. अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. महापुरामुळे दावणीलाच तडफडून पशुधन मोठ्या प्रमाणात दगावलं आहे. जिल्ह्यातील अनेक भागात अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे. शिवारातील पिकांचं तर होत्याचं नव्हतं झालं आहे. हे अभुतपुर्व नुकसान आहे. त्यामुळं मदतही अभूतपूर्वच असायला हवी.

पुढील दोन-तीन दिवसात आणखी पावसाचा अंदाज व्यक्त केला जात आहे. जिल्ह्यातील जवळपास सर्वच धरणं, तलाव ओसंडून वाहू लागले आहेत. पाणी धरून ठेवण्याची जमिनीची क्षमताही आता संपली आहे. त्यामुळे नदी, नाले, ओढ्यांकाठी वास्तव्यास असलेल्या नागरिकांनी अधिक सतर्कता बाळगणे आवश्यक आहे.

जिल्हा प्रशासनाने परंडा आणि भूम तालुक्यात तातडीने उपाययोजना अंमलात आणल्या आहेत. त्यामुळं अनेकांना हेलिकॉप्टरद्वारे सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यश आले आहे. अहिल्यानगर येथून सैन्य दलाचे पथकही दाखल होत आहे. प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. तुळजापूर आणि परिसरातील परिस्थितीची आपण स्वतः प्रत्यक्ष पाहणी केली आहे.

या अतिवृष्टीमुळं शेतकरी बांधवांच्या हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गानं हिरावला आहे. शेतकरी अन् सर्वसामान्य नागरिकही गंभीर आर्थिक संकटाच्या कचाट्यात सापडले आहेत. यामुळे धाराशिव जिल्ह्यात 'ओला दुष्काळ' जाहीर करून झालेल्या नुकसानपोटी शेतकर्यांना सरसकट आर्थिक मदत देण्यात यावी अन् संकटात सापडलेल्या बळीराजाला दिलासा द्यावा अशी मागणी झालेल्या नुकसानपोटी शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत करून संकटात सापडलेल्या बळीराजाला दिलासा द्यावा अशी मागणी मुख्यमंत्री . देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे केली आहे.

दरम्यान कोणतीही बिकट परिस्थिती निर्माण झाल्यास आपण स्वतः आणि जिल्हा प्रशासन मदतीसाठी तत्पर आहोत. तातडीच्या मदतीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधता येईल.

काहीही अडचण असल्यास आपण मला थेट ९८२०२८९७३२ या क्रमांकावर मेसेज करा किंवा माझे स्वीय सहायक जयेश कदम (मो. ९८८११६५५११), इंद्रजीत शेळके (मो. ९२२६५२५५११), रविराज चौगुले (मो. ७४४७२८५५११) यांनाही आपण संपर्क करू शकता.

त्यासोबतच कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदतीसाठी आपण खाली दिलेल्या क्रमांकावर प्रशासनाशी संपर्क साधू शकता.. असे आवाहन 'मित्र'चे उपाध्यक्ष, आमदार राणाजगजतिसिंह पाटील यांनी केले आहे.

९६५७५७६७१४ - डॉ मृणाल जाधव
तहसीलदार, धाराशिव
७७७६८८९९९९ - अरविंद बोळंगे,
तहसीलदार, तुळजापूर
९८८१७४५५७७ - हेमंत ढोकळे,
तहसीलदार, कळंब
९८२३७२२२७४ - जयवंत पाटील,
तहसीलदार, भूम
८२०८५१३६५६ - निलेश काकडे
तहसीलदार, परंडा
९०९६२५५७३७- प्रकाश म्हेत्रे,
तहसीलदार, वाशी
९४२२४६९०१३ - गोविंद येरमे,
तहसीलदार, उमरगा
७८७५२४३८३४ - रणजीत कोळेकर,
तहसीलदार, लोहारा

# ३० लिटर गावठी दारु अवैध जप्त

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाण अंतर्गत लता रा. राजेश नगर ढोकी ता. जि. धाराशिव, ह.मु. उपळा ता. जि. धाराशिव या दि.२२ रोजी उपळा जाणारे रोडचे बाजूला पडवळ यांचे विटभट्टी जवळ उपळा शिवार येथ अंदाजे ३,००० किंमतीची ३० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळग-लेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

# खेलो इंडिया शुटींग निवड चाचणीसाठी धाराशिवच्या खेळाडूंना आवाहन

धाराशिव, (जिमाका)- केंद्र शासनाच्या भारतीय क्रीडा प्राधिकरणामार्फत खेलो इंडिया राज्य निपुणता केंद्र (Khelo India State Centre of Excellence) अंतर्गत शुटींग खेळाचे निवासी प्रशिक्षण केंद्र व स्पोर्टस सायन्स सेंटर,श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी-पुणे येथे सुरू करण्यात आले आहे.

या प्रशिक्षण केंद्राकरिता शुटींग क्रीडा प्रकारातील प्रवेशासाठी निवड चाचण्या २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता,शुटींग रेंज, शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे-पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहेत.

या चाचणीत राज्यस्तरावर प्राविण्य मिळवलेले तसेच राष्ट्रीयस्तरावर सहभाग व प्राविण्य प्राप्त खेळाडू सहभागी होऊ शकतात. सहभागी होणाऱ्या खेळाडूंची जन्मतारीख ०१ जानेवारी २००५ किंवा नंतरची असावी,असे स्पष्ट करण्यात आले आहे.

इच्छुक पात्र खेळाडूंनी आपला अर्ज (Annexure-A) सोबत Annexure -B व Annexure-C, प्राविण्य प्रमाणपत्रे,आधारकार्ड, जन्मतारखेचा दाखला तसेच शाळेच्या जनरल रजिस्टरमधील जन्मतारखेची नोंद यांची छायांकित प्रत जोडून २४ सप्टेंबर २०२५ पर्यंत kiscepunegmail.com या ई-मेल आयडीवर पाठवावी.तसेच त्याची एक प्रत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,धाराशिव येथेही सादर करावी.अधिक माहितीसाठी धाराशिव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

# धारासूरमर्दिनी मंदिरात घटस्थापनेने नवरात्र उत्सवास प्रारंभ



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- ग्रामदैवत धारासूरमर्दिनी देवी मंदिरात सोमवार, दि. २२ सप्टेंबर रोजी इंद्रसेनसिंह राजेनिंबाळकर यांच्या हस्ते सपत्नीक विधिवत घटस्थापना होवून नवरात्र उत्सवास प्रारंभ झाला. नवरात्र उत्सव कालावधीत मंदिरात विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

नवरात्र उत्सवानिमित्त धारासूरमर्दिनी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. नवरात्र काळात पहाटेपासून भाविकांची गर्दी होत असल्याने मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप येते. देवस्थान समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही नवरात्रोत्सवात शहरातील विविध महिला मंडळांच्या वतीने महिला भाविकांसाठी विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी मंदिर समितीचे सचिव बाळासाहेब यादव, उपाध्यक्ष पोपट शेरकर, सदस्य शैलेश कदम, उमेश राजेनिंबाळकर, अक्षर राजेनिंबाळकर, पलय काकडे, सात्विक यादव, आदर्श साळुंके इतर सदस्य तसेच भाविक उपस्थित होते.

# तुळजाभवानी शारदीय नवरात्र येथे गर्दीचा फायदा घेऊन चोरी करणारे आरोपीवर स्थानिक गुन्हे शाखेची करडी नजर

धाराशिव (प्रतिनिधी)- श्री. तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव सुरू असून सदर महोत्सवात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून सदर गर्दी चा गैरफायदा घेऊन मोठ्या प्रमाणात मोबाईल चोर, पाकीटमार चोरांचा सुळसुळाट होत असतो अशा प्रकारच्या चोरांवर नियंत्रण ठेवण्याकरिता मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर मॅडम यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तुळजापूर नवरात्र महोत्सवा दरम्यान तुळजापुरात मालमत्ते विरुद्धच्या गुन्हे करण्याच्या हेतूने संशयितरित्या फिरणाऱ्या महिला व पुरुषांवर तसेच त्यांच्या टोळींवर प्रतिबंधक कारवाई करणे कामी आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने दिनांक २१ आणि २२ सप्टेंबर रोजी मालाविषयी गुन्हयांना आळा घालणेकामी पायी पेट्रोलींग करीत असताना गर्दीचा फायदा घेऊन मालाविषयी गुन्हे करण्याच्या उद्देशाने नवीन बस स्थानक तसेच महाद्वार परिसरात संशईतरित्या फिरताना मिळून आल्याने पुरुष १८ व महिला ०७ असे एकूण २३ जणांना ताब्यात घेवुन त्यांचेवर B.N.S.S. कलम १२८ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करीता रिपोर्टसह पोस्टे. तुळजापुर येथे हजर केले आहे. येत्या नवरात्र काळात अशाच प्रकारे मोठ्या प्रमाणात चोरांवर नियंत्रण ठेवण्याकरिता कारवाई करण्यात येणार आहे. सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर मा. अपर पोलीस अधिक्षक श्रीमती. शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सुदर्शन कासार,पोलीस हावलदार शौकत पठाण, जावेद काझी, प्रकाश औताडे, फरहान पठाण, महिला पोलीस हावलदार- शैला टेळे, चालक पोलीस अंमलदार नागनाथ गुरव, रत्नदीप डोंगरे यांचे पथकाने केली आहे.

